www.epitomejournals.com , Vol. I, Issue II, June 2015, ISSN NO : 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research

# केशवसुतांची कविता




डॉ. पी. विठ्ठल
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड - ४३१ ६०६.

मराठी कवितेला आधुनिक चेहरा प्रदान करणारे कवी म्हणून केशवसुतांची ओळख सबंध महाराष्ट्राला आहे. संत आणि पंत परंपरेत अडकलेल्या मराठी कवितेला नवा रस्ता दाखवण्याचे कार्य केशवसुतांनी केले. मराठी कवितेचा विचारच मुळी केशवसुत या नावापासून सुरु होतो. यावरूनच त्यांच्या कवित्वशक्तीचे महत्त्व लक्षात येऊ शकते. आजवर सर्व मराठी कविंवर जितके लिहिले गेले नसेल तितके एकट्या केशवसुतांवर लिहिले किंवा बोलले गेले आहे. मराठीतील सर्वाधिक टीकालेख/ग्रंथ कदाचित केशवसुतांवरच लिहिले गेले असावेत असे वाटते. विशेषतः चाळीस ते साठ या दोन दशकात तर केशवसुतांवर कित्येक ग्रंथ लिहिले गेले आहेत. रे. टिळक, गोविंदाग्रज, माधवराव पटवर्धन, रा.श्री. जोग, वि.स. खांडेकर, रा.शं. वाळिंबे, भ.श्री पंडित, दु.का. संत, स.रा. गाडगीळ,

दि.के. बेडेकर, वा.ल. कुलकर्णी, ना.म. भिडे, माडखोलकर, पां.दा. गुणे, शेणोलीकर, ना.के. बेहरे, डॉ. पारनेरकर, कुसुमाग्रज, मुक्तिबोध, म.वा. धोंड, अ.ना. देशपांडे, श्री.के. क्षीरसागर, म.वि. राजाध्यक्ष, प्रभाकर माचवे, दिलीप चित्रे, वि.म. कुलकर्णी यासारख्या नव्या-जुन्या पिढीतल्या अभ्यासकांची नावे जरी आपण डोळ्याखालून घातली तरी केशवसुतांवर किती भिन्न-भिन्न अंगाने चर्चा झाली असेल याची कल्पना येते. काहींना त्यांचे कर्तृत्व मान्य आहे तर काहींनी त्यांच्यावर आक्षेप नोंदवला आहे. काही अभ्यासकांनी एकतर्फी चिकित्सा केली आहे तर काहींनी डोळसपणे भलावण केली आहे. अनुकुल-प्रतिकुल क्रिया-प्रतिक्रियांमध्ये केशवसुतांची कविता अडकून पडली नाही, तर ती थेट लोकांपर्यंत पोहोचली. पाश्चात्त्यांचे अनुकरण केले म्हणून कुणी त्यांना झोडपले तर नवा सुधारणावादी विचार कवितेतून मांडला म्हणूनही त्यांचे वारेमाप कौतुक झाले. क्रांतिकारक कवी, युवप्रवर्तक कवी, द्रष्टे कवी, सौंदर्यवादाचे प्रणेते अशा प्रतिक्रियांपासून तर अगदी 'रोगट मनोवृत्तीचा कवी' इथपर्यंत अत्यंत टोकाच्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. केशवसुतांनी मराठी कवितेत क्रांती घडवून आणली हे विधान हास्यास्पद असल्याचाही निर्वाळा टीकाकारांनी दिला. याचा अर्थच असा आहे की, कोणत्याही काळातल्या कोणत्याही प्रतिभावंतांना सार्वत्रिक मान्यता कधीच मिळत नसते. ज्ञानेश्वर, तुकारामांपासून केशवसुत, मर्ढेकर, चित्रे, नेमाड्यांपर्यंत अशी अनेक उदाहरणे दाखवता येऊ शकतील. काहीही असले तरी मराठी कवितेत केशवसुतांनी केलेली कामगिरी सहजपणे दुर्लक्षीत करण्याजोगी नक्कीच नाही.

केशवसुतांच्या कुटुंबातील एक सदस्य असलेल्या परशराम चिंतामण दामले यांनी 'केशवसुतांची कविता अर्थात कृष्णाजी केशव दामले यांचा कवितासंग्रह' हे पुस्तक सिद्ध केले आहे. १३२ कवितांचा समावेश असलेल्या या पुस्तकाची पाचवी आवृत्ती सन १९४९ मध्ये प्रकाशित झाली आहे. सीताराम केशव दामले हे तिसऱ्या आवृत्तीचे संपादक असल्याचा उल्लेख प्रस्तुत आवृत्तीवर असून ती आवृत्ती कधी प्रकाशित झाली याचा उल्लेख मात्र नाही. सीताराम केशव दामले हे केशवसुतांचे कनिष्ठ बंधू तर प.चिं. दामले हे पुतणे होत. सीताराम केशव दामल्यांनी प्रस्तुत ग्रंथात केशवसुतांची चरित्रात्मक सहा पृष्ठांची माहिती जोडली आहे. एवढेच नव्हे तर केशवसुतांची जन्म-लग्नकुंडलीही दिली आहे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved




या कुंडलीवरून दामल्यांनी पुढील विवेचन केले आहे.

‘ही कुंडली पाहिल्याबरोबर ती कोणा अत्यंत भाग्यवान् माणसाच्या कुंडलीसारखी दिसते. इतर दृष्टीने ते भाग्यवान असोत वा नसोत तथापि श्रेष्ठ कवि म्हणून त्यांना मराठी काव्यामध्ये पहिल्या प्रतीचा दर्जा प्राप्त झाला असल्याने ते कुलदिपक झाले असे म्हणायास हरकत नाही.’[१]

प.चिं. दामल्यांनीच १९५६ साली ‘केशवसुत-स्मृति-ग्रंथ’ हा २५१ पृष्ठांचा ग्रंथ प्रकाशित केला आहे. सुमारे २२ अभ्यासकांनी लिहिलेल्या केशवसुतांविषयीच्या लेखांचा यात समावेश आहे. या दोनही ग्रंथाचा आणि तत्कालीन महत्त्वाच्या समीक्षकांच्या मतांचा आधार घेऊन केशवसुतांच्या कवितांचे मूल्यमापन करता येते. बहुतेक टीकाकारांनी केशवसुतांची कविता समजून घेण्यापूर्वी त्या काळाची पार्श्वभूमी लक्षात घेतली आहे आणि त्यानंतरच त्यांची चरित्रात्मक माहिती विचारात घेऊन कवितेवर भाष्य केले आहे. कारण कोणत्याही कवीचे मूल्यमापन त्याच्या अनुभूती आणि भूमिकेवरून केले पाहिजे.

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक प्रश्नांना ऐरणीवर घेऊन चिपळूणकर, लोकहितवादी, फुले, आगरकर, टिळक यासारखे समाजधुरीन व्यवस्थेच्या विरोधात बंड करत होते. इ.स. १८१८ च्या सुमारास भारतात ब्रिटिशांची राजवट सुरु झाली. सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल होऊ लागले. पोस्ट, रेल्वे, रस्ते यासारख्या नव्या सुविधांमुळे सामाजिक परिवर्तन घडू लागले. चातुर्वण्यावर आधारलेल्या आणि याच संस्कृतीत वाढलेल्यांना शिक्षणाची समान संधी दिली जाणे ही खऱ्या अर्थाने क्रांतीच होती. विषमतेवर अधिष्ठित असलेली रचना पाश्चात्त्यांनी समतावादी तत्त्वांवर उभी केली. कदाचित पुढे केशवसुतांनी जी नवी तुतारी फुंकली त्या तुतारीचा पाया याच तत्त्वांवर आधारलेला असावा. शिक्षण आणि मुद्रणाचा प्रसार म्हणजेच ज्ञान आणि नव्या मूल्यांचा प्रसार ठरला. घातक रुढी आणि परंपरांना प्रतिबंध ब्रिटिश संस्कृतीने केला. कायदा तयार केला. केवळ स्वप्नातीत वाटणाऱ्या आदर्श व्यवस्थेचा जणू परिपाठच इंग्रजी सत्तेमुळे सुरु झालेला होता. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात नव्या विचारधारेचा प्रवाह रुजत गेला.

'शिक्षणामध्ये इंग्रजी विचारवंतांचे विचार अभ्यासावयास मिळू लागले, त्यांच्या इतिहासाचे अध्ययन होऊ लागले. त्यांच्याकडे बद्धमूल झालेल्या राजकीय कल्पनांनी आमच्या समाजाच्या मनाची पकड घेतली, युरोपखंडात ज्याप्रमाणे विद्येच्या पुनरुज्जीवनानंतर धर्मसुधारणेची (रेफर्मेशन) प्रचंड लाट उत्पन्न झाली त्याप्रमाणे आमच्याकडेही या कालखंडात प्रार्थना समाज, आर्यसमाज, ब्राम्होसमाज या विविध धर्मसुधारक चळवळींचा प्रादुर्भाव झाला. चिकित्सक बुद्धीने, बुद्धिवादाच्या आश्रयाने आपल्या धार्मिक कल्पनांचे स्वरूप तपासून पाहण्याची जिज्ञासा जागृत झाली. कित्येक वर्ष आपल्या देशातील अव्वल बुद्धिमत्तेला जी मरगळ आली होती ती झटकून टाकून आपल्या जीवनाचा पाया नव्या विचारांवर आधारला पाहिजे अशी जाणीव सर्वत्र होऊ लागली.'[२]

याच दरम्यान मराठीत अत्यंत महत्त्वाची अशी नियतकालिके सुरु झाली. एका अर्थाने सर्वांगिण क्रांतीची ही सुरुवात होती. याच काळात क्रांतिनिष्ठ बुद्धिवाद मांडणारी केशवसुतांची कविता आली. ब्रिटिशांच्या बाह्य वैभवाला भूलून न जाता नागरिकांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण करून राष्ट्रवादाची उभारणी करणाऱ्या लोकहितवादी, म.फुले, आगरकर यांच्याबरोबरच केशवसुत हेही एक होते. श्रद्धावादाला बुद्धिवादाकडे नेण्याचे त्यांनी कार्य केले. नव्या सांस्कृतिक आणि वैचारिक मूल्यांवर आधारीत त्यांनी कविता लिहिल्या. आणि या कवितांच्या मागे अर्थातच ही संपूर्ण सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी आहे. ही पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय केशवसुतांच्या कवितांचे वेगळेपण ध्यानात येणार नाही. विष्णुशास्त्री चिपळुणकर, शिवरामपंत परांजपे, हरिनारायण आपटे यासारख्या विचारवंतांनी आपापल्या परिने लेखनाची नवी साधने स्वीकारली होती. केशवसुत कवितेतून सामाजिक जाणिवेच्या कक्षा रुंदावत होते.

केशवसुतांचा जन्म १५ मार्च १८६६ रोजी मालगुंड येथे झाला. (जि. रत्नागिरी) आणि ७ नोव्हेंबर, १९०५ रोजी त्यांचा मृत्यु म्हणजे अवघे ३९ वर्ष आयुष्य लाभलेल्या केशवसुतांनी उण्यापूऱ्या १३२ कविता लिहिल्या. नव्या जीवनमूल्यांची जाणीव करून देणाऱ्या या कवितांनी नवमूल्यांची प्रस्थापना देखील केली. जुन्या धार्मिक प्रथात अडकून पडलेल्या समाजाने नवीन दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय तो उन्नत होणार नाही याची जाणीव केशवसुतांना होती. याच जाणिवेतून त्यांनी 'तुतारी' कविता लिहिली.

*'धर्माचे माजवूनि डम्बर । नितीला आणिती अडथळे*
*विसरूनिया हें जातात खुळे । नीतीचें पद जेथे न ढळे*
*धर्म होतसे तेथेच स्थिर !*
*हल्ला करण्या तर दंभावर - तर बंडांवर*

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

*शूरांनो, या त्वरा करा रे ! समतेचा ध्वज उंच धरा रे !*

*नीतीची द्वाही पसरा रे तुतारिच्या ह्या सुराबरोबर !*

२८ मार्च, १८९३ रोजी लिहिलेल्या या कवितेने नवीन क्रांतिकारक विचार अत्यंत आवेशाने मांडला. धर्माच्या नावाचे अवडम्बर माजवून नीती आणि मूल्यांना पायदळी तुडवणाऱ्यांना केशवसुतांनी धारेवर धरले आहे. एखाद्या धर्मामुळे जर विषमता निर्माण होत असेल तर ते सर्वथा अयोग्य आहे. धर्म आणि नीतीचे नियम मानवाच्या सार्वत्रिक प्रगतीसाठी असले पाहिजेत. जर धर्माच्या नावाखाली मानवाचा विनाश होणार असेल तर असा धर्म हवाच कशाला ? अन्याय आणि अत्याचारविरुद्ध बंड करणारी ही कविता विलक्षण परिणाम करणारी आहे. केशवसुतांच्या ज्या काही महत्त्वाच्या रचना आहेत. त्यापैकी ही एक आहे. या कवितेवरही अनेकांनी स्वतंत्रपणे लिहिले आहे. तुतारीचा प्रभाव समकालीन कवींवर खूप मोठ्या प्रमाणात होता. भा.रा. तांब्यांनी मात्र 'ही कविता नसून कवितेच्या स्वरूपात उपदेश' असल्याचे म्हटले आहे.

मूर्तिभंजन ही अभंग वृत्तांत लिहिलेली केशवसुतांच्या सुधारणावादी विचारांचा प्रत्यय देणारी एक महत्त्वाची कविता आहे. नवसमाजनिर्मितीची ओढ आणि जुन्यांचा तिरस्कार हेच सूत्र त्यांच्या सामाजिक आशयाच्या कवितांमध्ये दिसून येते.

*'मूर्ति फोडा, धावा ! धावा फोडा मूर्ति,*

*आंतिल सम्पत्ति, फस्त करा !*

*व्यर्थ पूजा द्रव्यें, त्यांस वाहुनियां,*

*नाके घांसूनीयां काय लभ्य ?'*

रुढीतील निर्जीवपणा फेकून त्यातील उपयुक्तता तेवढी घ्या असे सुचित करणाऱ्या या कवितेमधून केशवसुतांच्या अलौकिक प्रतिभेचे दर्शन घडते. मराठीतल्या अनेक अभ्यासकांनी केशवसुतांच्या कवितेतून त्यांची चरित्रात्मक माहिती मिळवण्याचे किंवा तयार करण्याचे काम केले आहे.

यादृष्टीने रा.श्री जोग यांचे काम मोठे म्हणावे लागेल. सुमारे साडेतिनशे पृष्ठांचा ग्रंथ लिहून केशवसुतांचे मराठी कवितेतील स्थान त्यांनी घट्ट केले आहे. अर्थात हे करताना आंधळ्या सहानुभूतीने त्यांनी केशवसुत आणि त्यांच्या कवितांकडे बघितले नाही.

> 'केशवसुतांच्या तरुण वयात राजकीय व सामजिक चळवळी चालू होत्या. त्यातल्या त्यात सामाजिक सुधारणेविषयीचा कलह व वाद अधिक जोरात चालू होता. सामाजिक सुधारणाविषयक विचारांनी केशवसुतांवर अधिक परिणाम केला असला तरी देशाच्या पारतंत्र्याविषयीचे विचार आरंभी तरी अधिक येत असे दिसते. परंतु पुढे या राजकीय विचारांपेक्षा सामाजिक सुधारणाविषयक विचारांचे वर्चस्व त्यांच्या

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

मनावर झाले असे वाटते. यात आगरकरांच्या लेखनास खरेच कारणीभूत समजावे लागेल. रुढीविरुद्ध बंडाची भाषा जी तुतारी, स्फूर्ति, मूर्तिभंजन इत्यादी कवितांतून दिसते, ह.ना. आपटे यांना उद्देशून लिहिलेल्या कवितेत जो स्त्रियांच्या उद्धाराचा उल्लेख येतो, अस्पृश्याचा मुलगा किंवा मजुरावरील उपासमारीचा प्रसंग हे कवितांचे विषय झालेले जे दिसतात, त्यावरून आगरकर संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची छाप केशवसुतांवर पडली होती असे स्पष्ट दिसते. [३]

यासारखे जोगांनी केलेले विश्लेषण केशवसुतांची कविता समजून घेताना महत्त्वाचे ठरते.

*'देवी सागरिका ! तुम्ही तर अतां ती गायने गाइजे*
*त्यांच्या धुंद अफूगुणे किरकिऱ्या बाळास या आणिजे*
*निद्रा दीर्घ -'*

या कवितेवरून भ.श्री पंडितांनी 'केशवसुत जात्याच अशक्त व किरकिरे होते' [४] असा शोध लावला आहे. तर दुसऱ्या एका कवितेवरून ते एकलकोंडे, माणुसघाणे आणि वरवर पहाणाऱ्यास तरी अबोल व दुर्मुखलेले दिसत असे म्हटले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की केशवसुतांचे उपलब्ध छायाचित्रही काल्पनिक असल्याचे किंवा स्मरणाने काढल्याचे वि.स. खांडेकरांनी 'केशवसुत काव्य व कला' या आपल्या पुस्तकात (पृ.१४) नमुद केले आहे. कविच्या चरित्रात्मक माहितीवरून त्याच्या कवितांचा अन्वयार्थ लावणे किंवा कवितेतून चरित्रात्मक माहिती उपलब्ध करून घेणे या दोन्हीही गोष्टी कठीणच असल्या तरी प्रत्येक अभ्यासक आपापल्या परीने मांडणी करत असतो.

केशवसुतांची 'कविता आणि कवी' ही अगदी सुरुवातीची कविता आहे.

*'अशी असावी कविता, फिरून, तशी नसावी कविता, म्हणून*
*सांगावया कोण तुम्ही कवीला, अहांत मोठे ? पुसतों तुम्हाला*
*युवा जसा तो युवतीस मोहे, तसा कवी हा कवितेस पाहे*
*तिला जसा तो करितो विनंती, तसा हिला हा करितो सुवृत्ती'*

सदर कविता वाचली तरी केशवसुतांच्या काव्यनिर्मितीविषयीचा नवा विचार लक्षात येतो. पारंपरिकतेला नवे वळण देऊन अंत:प्रेरणेतून त्यांनी कविता लिहिल्या. केशवसुतांच्या कवितांचे स्वरूप ठरवण्यापूर्वी त्यांच्या समकालीन परिस्थिती कशी होती तसेच त्यांच्यापूर्वीच्या वाङ्मयाचा त्यांच्यावर काही प्रभाव पडला आहे काय ? याचाही विचार करावा लागतो. 'केशवसुतांच्या मनावर आरंभी झालेले संस्कार हे संस्कृत काव्याचेच प्रामुख्याने असावेत असे दिसते. त्यांची पहिली कविता रघुवंशांतील एका उताऱ्याचे भाषांतर होय.' असे रा.श्री. जोगांनी

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

'केशवसुतांची कविता' या ग्रंथात नमूद केले आहे. (पृ.५) संस्कृत साहित्याचा प्रभाव केशवसुतांवर होता हे उघडच आहे. पण पाश्चात्य वाङ्मयाच्या वाचनामुळेच त्यांनी पारंपरिक साहित्याचे संकेतसिद्धांत बदलून टाकले हे जास्त महत्त्वाचे आहे. विशेषतः इंग्रजी भाषेतील सॉनीटचे मराठीत सुनीत या नावाने केलेली वृत्तबद्ध रचना आदर्श स्वरूपाची असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. शार्दुल विक्रीडित या गंभीर व विशाल आंदोलनात्मक वृत्तात त्यांनी सुनीतांची रचना केली आहे.

> 'मयूरासन आणि ताजमहल' हे केशवसुतांनी १३ नोव्हेंबर, १९८२ रोजी लिहिलेले पहिले सुनीत असून १३ मे १८९३ च्या करमणुकपत्रात ते प्रकाशित झाले आहे. इंग्रजी साहित्याच्या अभ्यासामुळेच केशवसुत सुनीताकडे वळल्याचे दिसते. अर्थात केशवसुतांचे कवितेतील क्रांतिकारकत्त्व जसे अनेकांना मान्य नसते तसे ते सुनीताचे प्रवर्तक होऊ शकत नसल्याचेही अनेकांचे म्हणणे आहे. रा.श्री. जोगांनी मराठी सुनीताचा जन्म या आपल्या लेखात याची सविस्तर चर्चा केली असून केशवसुतांनी केवळ नऊच सुनीते लिहिली असली तरी ती 'मराठीमध्ये त्याचे प्रवर्तन व्हावयास नऊ सुनीते वस्तुतः पुरेशी आहेत.' [५]

असे सांगून टीकाकारांची तोंडे बंद केली आहेत. 'स्मरण आणि उत्कंठा', 'आम्ही कोण', 'प्रतिभा', 'वियोगामुळे', 'चिरवियुक्ताचा उद्धार', 'मयूरासन आणि ताजमहल' इ. सुनीते केशवसुतांनी लिहिली आहेत. अर्थ गांभीर्य आणि अर्थगौरव या विशेषांमुळे सुनीतांना महत्त्व आहे. 'घुबड' ही कविता एड्गर ॲलन पो या प्रसिद्ध अमेरिकन कविच्या 'ढहश ठरींशप' या अप्रतिम कवितेवर आधारलेली आहे. प्रस्तुत कविता मूळ इंग्रजी कवितेपेक्षा सरस उतरल्याचे ना.के. बेहरे यांनी प्रस्तावनेत [६] म्हटले आहे. कदाचित मूळ इंग्रजी कवितांचा शब्दशः अर्थ त्यांना कळला नसावा किंवा कळला असला तरी फक्त भावार्थच त्यांनी आधारास घेतला असेल व त्या आधारावरच त्यांनी आपल्या प्रतिभेने स्वतंत्र काव्याची उभारणी केली असेल अशी पुष्टीही ते जोडतात. तर रा.शं. वाळिंबे यांनी मात्र नेमकी विरोधी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मते,

> 'मूळ इंग्रजी कवितेतील शब्दयोजना व लयबद्धता या दोन्ही गोष्टी अप्रतिम आहेत. केशवसुतांच्या कवितेत हा कलात्मक प्रकर्ष नाही. तसेच मूळ कवितेतील औदासीन्याचा अतिरेक, आणि भयाण एकटेपणाची विचित्र धास्ती, याही गोष्टींचा प्रभावी आविष्कार केशवसुतांना साधला नाही.' [७]

यावरून त्यांच्या या वेळच्या मनोवृत्तीची कल्पना येईल. एकाच कवितेबद्दलची दोन परस्परभिन्न मते लक्षात घेतली तर प्रत्येक टीकाकार आपापल्या परीने आकलन करून घेण्याचा प्रयत्न करत असतो हे सहज लक्षात येईल. 'घुबड' या कवितेतील शेवटच्या चार ओळी पुढीलप्रमाणे आहेत.

*भुतें नाचती भयानकपणें ! चित्तीं उपजविती घोर !*

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

*नैराश्यें मज पुरें घेरिलें,*

*खिडकीपुढ्नी घुबड न हाले,*

*घू घू ! घू घू ! चाले त्याचा घू घू भीषण घुत्कार !*

घुबडाचा आवाज अप्रिय, भीतीप्रद आणि अशुभ मानला जातो. रेव्हनच्या शब्दाला मूळ कवितेत छर्शींशी ीश असा अर्थ 'पो' ने दिला आहे. केशवसुतांनी घू-घू असा देऊन त्यांच्याद्वारे 'उंहू' असा सदृश्य ध्वनीचा नकारात्मक अर्थ गृहीत केला आहे. हे रुपांतर चांगले झाल्याचा अभिप्राय रा.श्री. जोगांनी (पृ.२०८) दिला आहे. 'सतारीचे बोल' ही कविताही परकीय कल्पनेवर आधारलेली आहे. मानवी मनावर संगीताचा होणारा परिणाम या कवितेतून सुचवला आहे. इंग्रजी कवी ड्रायडन् याने अश्रशुरपवशीफि ऋशरींि ी ींहश झ्रेशी ेष चौीळल या कवितेवरून ही कल्पना केशवसुतांना सुचली असावी असे जोगांना वाटते.

*'काळोखाची रजनी होती*

*हृदयी भरल्या होत्या खंती;*

*अंधारांतचि गढलें सारें*

*लक्ष्य, न लक्षी वरचे तारे;*

*विमनस्कपणें स्वपदे उचलित,*

*रस्त्यांतुनि मी होतो हिंडत*

*एका खिडकींतुनि सूर तदा*

*पडले - दिड दा, दिड दा, दिड दा !'*

आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने केशवसुतांची ही एक उत्कृष्ट कविता आहे. कवी खिन्न, उदासीन अवस्थेत चाललेला असताना एका खिडकीतून त्याला सतारीचे बोल ऐकू येतात. मात्र खिन्नतेमुळे ते गोड बोलही त्याला रुचत नाहीत. मोठा कथाशय या रचनेत दडला आहे. शेवटी उत्साहित करणारे सूर सतारीतून निघू लागताच अवघी पृथ्वीच आनंदमय झाल्याचे कविला वाटते. अत्यंत परिणामकारक आणि अर्थपूर्ण शब्दांच्या योजनेतून ही कविता केशवसुतांनी साकारली आहे.

'उदात्त बुद्धीला संसारात राम नाही. अलौकिक असें जे कांही तिला पाहिजे असते ते तिच्या हक्काचे असून देखील त्याच्या प्राप्तीकरिता तिला झुरत पडावे लागत नाही काय ?' या प्रास्ताविक टीपेसह 'हरपले श्रेय' ही कविता केशवसुतांनी मृत्युच्या पूर्वी साडेपाच महिने म्हणजे २५ मे १९०५ रोजी लिहिली. केशवसुतांच्या गाजलेल्या कवितांपैकी ही एक महत्त्वाची कविता आहे. अनेक अभ्यासकांनी या कवितेवर भरभरून भाष्य केले आहे. चिपळूणला असताना शेजारी एक परित्यक्ता दुःखी स्त्री कवीने पाहिली आणि तिचे दुःख बघूनच ही कविता त्यांनी

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

लिहिल्याचे सांगितले आहे. सी.के. दामले, माधवराव पटवर्धन, राजवाडे, जोग या अभ्यासकांनी कवितेतील अध्यात्मिक विचाराला तिचे मर्म मानले आहे. तसेच वर्डस्वर्थच्या जवश`प`िंहश खर्पींळारींळेपी`ष खर्ाींीरश्रळीं या प्रसिद्ध कवितेशी प्रस्तुत रचनेचे साम्य दाखवले जाते. दि.के. बेडेकरांनी मात्र या कवितेचा अन्वयार्थ वेगळ्या पद्धतीने दाखवला आहे. 'या कवितेत स्त्रीच्या दुःखाचा वा मुक्ततेचा आशय नाही. तसेच केवळ जीव आणि परमात्मा किंवा ईश्वर यांच्या मीलनाचे अध्यात्मही येथे अभिप्रेत नाही.'[८] असे ते सांगतात. या कवितेत कविने स्वतःचे दुःख व अध्यात्म सांगितले आहे. त्या अध्यात्मात तेजाकडे जाण्याची उत्कट तळमळ आहे व आशा आहे. आशा व निराशेचे उत्कट द्वंद्व या कवितेत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. रा.शं. वाळिंबे यांनी सांगितलेला अर्थ अधिक व्यवहार्य वाटतो. त्यांच्या दृष्टीने माहेर सोडून सासरी आलेल्या आणि संसारात मग्न असलेल्या स्त्रीच्या आत्मनिवेदनाच्या रुपाने कवीने अमर्याद अनंताच्या शोधासाठी तळमळणाऱ्या उदात्त बुद्धीची तळमळ व्यक्त केली आहे. सारे त्रिखंड पालथे घातले तरी जे एकदा हरपले ते पुन्हा सापडत नाही. ज्यांच्या डोळ्यासमोर काही उदात्त ध्येय आहेत अशी माणसे स्वतःहून प्राणार्पणाला तयार होतात. केशवसुतांची 'झपूर्झा' ही कविताही त्यांच्या लोकप्रिय कवितांपैकी एक आहे. या कवितेच्या प्रारंभी केशवसुतांनी पुढीलप्रमाणे टीप लिहिली आहे.

'आपल्यास जे काही नाही असे वाटते, त्यातूनच महात्मे जगाच्या कल्याणाचा चिजा बाहेर काढितात. त्या महात्म्यांची स्थिति लक्षात वागवून पुढील गाणें वाचिल्यास, ते दुर्बोध होऊ नये असे वाटते.'[९]

२ जुलै, १८९३ रोजी मुंबईत लिहिलेल्या या कवितेच्या प्रारंभीक ओळी अशा आहेत.

*'हर्षखेद ते मावळले*

*हास्य निमालें*

*अश्रू पळाले;*

*कण्टक शल्ये बोंथटली*

*मखमालीची लव वठली;*

*काही न दिसे दृष्टीला*

*प्रकाश गेला,*

*तिमिर हरपला;*

*काय म्हणावें या स्थितिला ?*

*झपूर्झा ! गडे झपूर्झा !*


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

प्रतिभाशाली कलावंत, तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ यांची जी उन्मनी अवस्था होते तिचे काव्यात्म दर्शन या कवितेत दिसते. 'झपूर्झा' या शब्दाविषयी आणि एकूणच कवितेविषयी भ.श्री पंडित यांनी केलेले विवेचन असे आहे. 'झ पू र्झा' हा शब्द केशवसुतांनी खास आपल्या टाकसाळीत पाडलेला आहे. त्यांना ऐहिक उपाधी विसरलेल्या निःसंग मनःस्थितीचे वर्णन करावयाचे होते. त्यासाठी यथातथ्य प्रतिमा म्हणून त्यांना आपल्या घरी कोकणात झिम्मा हा पोरींचा खेळ आढळला. मुली झिम्मा खेळताना जेव्हा एकमेकींच्या हातावर 'जा पोरी ! जा, जा पोरी ! जा' म्हणत म्हणत, हात मारून गोल गोल फिरू लागतात. तेव्हा त्यांची जी तन्मयता होते, तिचे साम्य त्यांना निःसंग मनुष्याच्या मनःस्थितीशी आढळले, आणि म्हणून त्यांनी 'काय म्हणावे या स्थितीला' असा प्रश्न विचारून स्वतःच उत्तर देवून टाकले आहे की, तिला 'झपूर्झा' असे म्हणावे. 'झपूर्झा' या शब्दाचे मूळ शोधल्यानंतर ते इमर्सनच्या काव्यपंक्ती आणि या कवितेतील पहिले कडवे समानार्थक असल्याचे मत नोंदवतात. तर रा.शं. वाळिंबे उत्कट प्रकर्षाच्या क्षणी अथवा उच्च ज्ञानाच्या पूर्वीच्या क्षणी होणाऱ्या तल्लीनतेलाच केशवसुतांनी 'झपूर्झा' हे गुढरम्य नाव दिल्याचे म्हटले आहे. काहीही असले तरी या कवितेने वाचकांना निश्चितच आनंद दिला आहे. नादमधूर शब्दयोजनेमुळे एक प्रकारे संगीतच या रचनेत निर्माण झाले आहे.

केशवसुतांचे काव्यविषयक विचार अत्यंत परखड व अभिनव स्वरूपाचे होते. कवितेच्या मूळ कल्पनेला धक्का देऊन नवीन संकल्पना रुजवणे हा विचार त्यांच्या कवितेतून प्रकर्षाने जाणवतो. कवी हा झोपलेल्यांना जागा करणारा, त्यांच्यात चैतन्य भरणारा असून त्याच्या कवितेमुळे नैराश्याची भावना नष्ट झाली पाहिजे असे त्यांचे मत होते. केवळ रंजनासाठी किंवा श्रमाचा भार हलका करण्यासाठीच कविता असू शकत नाही तर सामाजिक सुधारणेसाठी सुद्धा कविता उपयुक्त ठरू शकते ही धारणा केशवसुतांची होती.

*'पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,*
*टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथून या देऊ कसें ।*

अशी बंडाची भाषा 'स्फूर्ति' या कवितेत ते करतात. व्यक्तिवाद, स्वातंत्र्यवाद, मूर्तिभंजन आणि आत्मनिष्ठा अशा गोष्टी केशवसुतांच्या वृत्तीत होत्या. केशवसुतांचे महत्त्व अधोरेखित करताना रा.शं. वाळिंबे यांनी आपल्या ग्रंथात बाळकृष्ण अनंत भिडे यांचे मत नोंदवले आहे. त्याचा सारांश साधारण पुढीलप्रमाणे : केशवसुतांचे समकालीन (सुमारे अठरा नावे आहेत) असणाऱ्या कवींच्या कवितेचे अवलोकन केले तर केशवसुतांनी ज्या सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमीवर कविता लिहिल्या त्याच परिस्थितीत हे सर्व कवी लिहित होते. मात्र केशवसुतांची मनोवृत्तीच वेगळी होती. म्हणजेच भिडे यांनी या सर्व कवींचे केशवसुतांच्या रचनेशी साम्य होते असे म्हटलेले दिसते. आश्चर्य म्हणजे या यादीत टिळक, तांबे, विनायक, बी. इत्यादी रोमँटिक कवीही होते. केशवसुतांचे समकालीन कवी पंडिती वळणाची वृत्तबद्ध रचना जेव्हा करत होते तेव्हा केशवसुतांनी मात्र रचना विषयक प्रयोग

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

करण्याचे धाडस केले. हेच त्यांचे वेगळेपण असे करताना त्यांनी काही ठिकाणी यमकांचे बंधन झुगारले तरी कधी जाणीवपूर्वक योजना केल्याचेही दिसून येते.

अक्षरवृत्ताऐवजी 'जाती'ची रचना करणे ही केशवसुतांची मोठी कामगिरी असल्याचे वाळिंब्यांनी नमूद केले आहे. कारण त्यामुळे त्यांना रचनाविषयक स्वातंत्र्य आणि गेयताही आपोआप निर्माण झाली. केशवसुतांच्या रचनेवर प्रारंभी म्हटल्याप्रमाणे अनुकूल-प्रतिकूल मते व्यक्त होत राहिली.

> 'केशवसुतांनी कवितेच्या रचनेत ऋजुता, स्पष्टपणा, साध्या शब्दांचा वापर व उत्स्फूर्तता यावर भर दिला. शब्दांचे आलंकारिक, कृत्रिम 'लालित्य', भावनांचा उद्रेक किंवा विव्हलता, तसेच ऐंद्रिय अनुभवांचा गाढपणा यावर त्यांनी भर दिला नाही.'[१०]

त्यामुळे झाले असे की केशवसुतांची कविता काही रसिकांना रुक्ष, ओबडधोबड आणि विचारकर्कश वाटली. सामाजिक बंडखोरीच्या कवितेचे काहींनी कौतुक केले तर इतरांना मात्र ती प्रचारकी, रसहीन व आक्रस्ताळी वाटली. आज सव्वाशे वर्षानंतरही त्यांच्या कवितेचे सामर्थ्य आणि मर्यादाचा शोध अभ्यासक घेत आले आहेत. मानवतावादाच्या ध्येयाने प्रेरीत झालेल्या केशवसुतांनी कवितेतून क्रांतिकारक आशय मांडला. जुन्या शब्दांना नवा आशय देणे, जुन्या संकेतांना नवा अर्थ देणे आणि गरज पडेल तेव्हा नवे शब्द व संकेत जन्माला घालणे हे नवकवींचे उद्दिष्ट, कार्य व सामर्थ्य असते. केशवसुत या अर्थाने आधुनिक मराठी कवितेचे युगनिर्माते होते असे मत बेडेकरांनी नोंदवले आहे. कवितेचा आकृतिबंध, आशयाचे नावीन्य, वेगळेपण केशवसुतांच्या बहुतेक कवितांमधून प्रत्ययास येते. आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावा वाटतो. तो म्हणजे 'केशवसुत स्मृति-ग्रंथात' धों.वा. गद्रे (काव्यविहारी) यांनी 'माझे गुरु केशवसुत' या नावाचा एक सुंदर लेख लिहिलेला आहे. केशवसुतांना ते गुरुस्थानी मानत असल्यामुळे अर्थातच त्यांच्या प्रती सहानुभूती ठेऊनच मात्र तसे न दाखवता त्यांनी विस्तृत लिहिले आहे. त्यांच्या या लेखातून काही महत्त्वाच्या गोष्टी वाचकांच्या हाती लागतात. म्हणजे असे की, कै. प्रा.डॉ.पां.दा. गुणे हे केशवसुतांचे पहिले सहृदय टीकाकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केशवसुतांची कविता सन १९१७ मध्ये संग्रहरुपाने प्रकाशित झाली तेव्हा डॉ. गुणे यांनी मनोरंजन मासिकाच्या ऑक्टोबर १९१७ च्या अंकात परीक्षणात्मक लिहिला होता. या लेखामुळेच महाराष्ट्रीय वाचकांना केशवसुतांचा पहिल्यांदा परिचय झाला. डॉ. गुणे यांनी केशवसुतांचे वारेमाप कौतुक केलेले आहे. 'अफाट कल्पनाशक्ती, प्रचंड निरीक्षण, पराकाष्ठेची सहृदयता, प्रासादिक वाणी, भाषेवरील प्रभुत्व, तिला वाटेल तसे लववावयाचे सामर्थ्य व आपणाला, आपल्या देशबांधवांना सृष्टीचा, परमेश्वराचा, उदात्त संदेश सांगावयाचा आहे ही दृढ भावना, ही महाकवी होण्याला लागणारी सामग्री केशवसुत यांच्यामध्ये होती.' असा अभिप्राय नोंदवला आहे. अर्थात या अभिप्रायावर मतभेद

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

संभवतातच. ग.त्र्यं. माडखोलकरांनी 'आधुनिक कविपंचक' या ग्रंथात १९२१ मध्ये भरपूर स्तुती केली असून १९३५ च्या सुमारास मात्र त्यांचे मत विरोधी बनल्याचे दिसते. माडखोलकरांना केशवसुत हे प्रणयपीडित व गलितोत्साह वाटू लागून त्यांनी त्यांच्यावर मानसिक विकलतेचा व विकृतीचा आरोप केला आहे. माडखोलकरांच्या या बदललेल्या मताचा परामर्श रा.श्री जोगांनी आपल्या ग्रंथात घेतला आहे. माधवराव पटवर्धन, कुसुमावती देशपांडे, म.वि. राजाध्यक्ष आदी महत्त्वाच्या अभ्यासकांच्या मतमतांतराचा सुंदर आढावा काव्यविहारींनी आपल्या लेखात घेतला आहे. त्यामुळे केशवसुतांवर झालेल्या टीकाटिप्पणीचे स्वरूप नव्या पिढीतील अभ्यासकांना कळू शकेल. अलिकडच्या काळात गौरवग्रंथाची मोठी लाट आलेली दिसते. हे ग्रंथ बहुतांश त्या व्यक्तीची चरित्रात्मक माहिती देणारे व कौतुक करणारेच असतात. मात्र 'केशवसुत-स्मृति ग्रंथ' हा केशवसुतांचे कठोर वाङ्मयीन मूल्यमापन करणारा पहिला गौरव ग्रंथ असावा असे वाटते.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे अनेक अभ्यासकांनी केशवसुतांच्या कवितेतूनच त्यांचे व्यक्तिमत्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे. केशवसुत कसे दिसत ? कसे बोलत ? त्यांची शरीरयष्टी कशी होती ? इथपासून तर ते देव मानत होते की नव्हते ? इथपर्यंत अत्यंत चिकित्सकपणे शोध घेतला गेला आहे. 'केशवसुत काही दृष्टिकोन' या ग्रंथात मु.गो. देशपांडे यांनी नवीनच हकिकत सांगितली आहे. १९४८ साली आचार्य भागवतांनी मुंबईत केशवसुतांवर काही व्याख्याने दिली होती. त्याचवर्षीच्या सत्यकथेच्या फेब्रुवारीच्या अंकात याचा गोषवारा प्रकाशित झाल्याचे नमूद करून ते लिहितात,

> 'केशवसुत प्रचलित अर्थाने देव मानणारे नव्हते; एकदा तर ते नास्तिकतेच्या पराकोटीला जाऊन महादेवाच्या पिंडीवर नाचले होते असे म्हणतात.'[११]

अर्थात 'मुर्ती फोडा' म्हणणारे केशवसुत नास्तिकच असावेत असे दिसत असले तरी ते पिंडीवर नाचले, यासारखे विधान मात्र अत्यंत सवंग वाटते. मात्र असे घडू शकते की ब्रिटिश राजवटीमुळे आणि त्यांच्या काळात सुरु झालेल्या नव्या शिक्षणप्रणालीमुळे देवधर्माविषयीच्या असलेल्या रुढ कल्पना नक्कीच बदललेल्या असतील. केशवसुतांच्या कवितांचे नीट अवलोकन केले तर ही बाब लक्षात येऊ शकते. कारण एखाद्या नव्या व्यवस्थेमुळे माणसाचे विचार बदलू शकतात. केशवसुतांच्या बाबतीत तसे घडले असण्याची शक्यता आहे.

> 'केशवसुत रुढ अर्थाने आस्तिक नव्हते. ते अज्ञेयवादी होते. बुद्धिवादाकडे आकृष्ट झालेल्या महाराष्ट्राच्या मध्यम वर्गात ते जन्माला आले. इतकेच नव्हे तर बुद्धिवादाची निष्ठापूर्वक उपासना करणाऱ्या आगरकरांची शिकवण त्यांनी आत्मसात केली आणि ओजस्वी सामाजिक कवितांच्या रुपाने ती जनमनापर्यंत नेऊन पोचविली. काव्य हाच त्यांचा वेदान्त आणि तेच त्यांचे अध्यात्म होते.'[१२]


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

केशवसुतांवर लिहिताना अनेक अभ्यासक गौरवभावनेच्या आहारी गेलेले दिसतात. प्रा.गो.वि. करंदीकरांनी मात्र सत्यकथेच्या जून १९६६ च्या लेखात 'केशवसुतांच्या कवितेतील शब्द समरसतेचा अभाव व प्रतिमा-समरसतेचा अभाव ही केशवसुती काव्यशैलीची फार मोठी वैगुण्ये आहेत' असे म्हटले आहे. हे भाष्य करताना त्यांनी वर्डस्वर्थशी तुलना केली आहे. म्हणजे असे की, वर्डस्वर्थमध्ये जी प्रगल्भता, उद्रेकी अनुभवांचा प्रशांत मनःस्थितीतील पुनःप्रत्यय व पुनर्घटना करू शकणारी सृजनशील अवस्था किंवा तरल चिंतनात्मकता आहे ती केशवसुतांमध्ये सामान्यतः आढळत नाही. भोवताली घडणाऱ्या कोणत्याही गोष्टीकडे तात्त्विक दृष्टीने बघण्याची सवय जडल्यामुळे केशवसुतांची कविता विचारगर्भ झाल्याचे दिसत असले तरी आपल्या अनेक कवितांमधून जीवनाविषयीची तीव्र निराशाच त्यांनी प्रकट केलेलीही दिसते.

*'काळोखाच्या जगामध्ये या,*
*मृत आशांच्या चित्तांवरूनि या*
*पिशाच्च माझें भटकत आहे - शांति नसेचि तया !'* (पुष्पाप्रत)

किंवा

*'अमुचा पेला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा*
*पितां बुडाशीं गाळ दिसे, त्या अनुभव हे नाव असे !'* (पद्यपंक्ति)

अशा अनेक रचनांमधून केशवसुतांनी नैराश्य भावना प्रकट केलेली दिसते. स्वतःच्या जीवनाविषयी एवढे उद्विग्न विचार ते मांडतात, याचे उत्तर मात्र मिळत नाही. एकीकडे संघर्षाची, बंडाची, रूढीचे दास्य भेदून टाकण्याची भाषा करणाऱ्या केशवसुतांची ही दुसरी बाजूही अत्यंत महत्त्वाची वाटते. सामाजिक आशयाच्या कवितांमुळेच प्रामुख्याने केशवसुतांचे थोरपण अधोरेखित झाले असले तरी त्यांनी काही प्रेमकविताही लिहिल्या आहेत. विशेष म्हणजे सव्वाशे वर्षापूर्वी अशी प्रेमभावना प्रकट करणारी कविता लिहिणे हे धाडसाचेच होते. कारण तत्कालीन समाजात अशा गोष्टी असंस्कृत वाटण्याची शक्यता मोठी होती. कदाचित या गोष्टींची जाणीव केशवसुतांना नक्कीच होती. त्यामुळेच त्यांनी लिहिलेल्या प्रेमभावाच्या कविता उत्तान शृंगारापासून खूप दूर राहिलेल्या आहेत. त्यांच्या प्रेम कवितांचे विश्लेषण करताना रा.शं. वाळिंबे यांचे मत खूप महत्त्वाचे वाटते.

> 'प्रेमाविषयी आणि स्त्री-सौंदर्याच्या प्रभावाविषयी केशवसुतांच्या बारा-तेरा कविता आहेत. यातल्या बऱ्याचशा कविता केवळ औपचारिक आहेत. प्रणयभावनेचा उत्कट व रसरसलेल्या आविष्कार केशवसुतांच्या एकाही कवितेत दिसत नाही. प्रेमाच्या व सौंदर्याच्या अलौकिक प्रभावाविषयी प्रचलित असलेले सार्वजनिक विचार प्रकट करण्यापलीकडे केशवसुतांनी फारसे काही केले नाही. केशवसुतांच्या कवितांचा काळ १८८५ ते १९०५ हा आहे. या कालखंडातील महाराष्ट्राची सामाजिक स्थिती विचारात

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

घेतली असता तरुण स्त्री पुरुषाचे विवाहपूर्व प्रेम ही गोष्ट त्याकाळी केवळ कल्पनेतच होती असे दिसून येईल. केशवसुतांच्या प्रेमविषयक कवितांचे स्वरूप औपचारिक का झाले हे यावरून स्पष्ट होईल.'[१३]

'प्रियेचे ध्यान', 'काल आणि प्रियेचे सौंदर्य', 'प्रीति', 'समृद्धि आणि प्रीति', 'प्रयाणगीत', 'प्रत', 'कविता आणि प्रीति', 'स्वप्न', 'प्रियेला सादर केलेली पुष्पमाला किंवा कर्तव्य आणि प्रीति', 'प्रीतीची भाषा', 'रुष्ट सुन्दरीस', 'प्रणयकथन', 'वियोगामुळे', 'चिरवियुक्ताचा उद्गार', आणि 'मनोहारिणी' या केशवसुतांच्या कविता निखळ प्रेमकविता नसल्या तरी त्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रेमभाव प्रकट करणाऱ्या कविता आहेत. माणसाच्या आयुष्यात प्रेमभावना नसेल तर असे आयुष्य नीरस ठरते हा विचार केशवसुतांनी मांडला आहे. मात्र 'प्रीति' ही सहज मिळणारी गोष्ट नाही किंवा ती बाजारू वस्तूही नाही.

*'प्रीति मिळेल का हो बाजारी ?*
*प्रीति मिळेल का हो शेजारी ?*
*प्रीति मिळेल का हो बागांत ?*
*प्रीति मिळेल का हो शेतात ?*
*प्रीतिची नसे अशि ग मात;*
*पहा शोधुनि हृदयांत !'*

प्रेमाचा महिमा हा अलौकिक असल्याचे सांगत 'प्रयाणगीत' या कवितेतही केशवसुत प्रेमाचा अलौकिक प्रभाव दाखवतात. जे मानवी जीवनात तेच निसर्गातही घडत असते.

*'तुजविण मजला कांहि असेना प्रिय या गे जगतीं;*
*तूं मम जीवित, तूं मम आत्मा, तूं माझी शक्ति !*
*तुजला सोडुनि जाणें येई, सखे ! जिवावरती,*
*परी ओढुनी दूर नेति या, निर्दय दैवगति !'*

दैवगतीमुळे आपल्याला सोडून जाणे भाग असले तरी पुनर्मिलन होण्याची शक्यता आहे अशी खात्री ही कविता देते. 'प्रीतिची भाषा' या कवितेतून एक प्रसंगच कवीने उभा केला आहे.

*'माझ्याशी नच बोलशी, तर तुझा मी नाहीं जा !' बोललो*
*तों अश्रू गळती तिचे टपटपां ! - मी फार पस्तांवलो !'*

फार अलंकारीक किंवा प्रतिमाबंबाळ न लिहिताही केशवसुतांची कविता रसपूर्ण ठरते. प्रेमाची अनुभूती ही आत्मिक असते.


Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

प्रत्येक काळात प्रेम-काम-याचा अनुभव प्रत्येकाने घेतलेलाच असतो. मात्र सांस्कृतिक आदर्श आणि परंपरेच्या दडपणामुळे लोकांना ते बोलून दाखवता येत नाही. केशवसुतांनी मात्र स्वतःच्या खऱ्या खुऱ्या भावभावना उत्कटतेने व्यक्त केल्या. त्यांनी घेतलेला प्रेमाचा अनुभव कवितेतून मांडला. कधी तो कल्पनारम्य, तर कधी चिंतनात्मक होता. शाब्दिक अवडंबर न माजवता उत्कट आत्मनिष्ठेतून केशवसुतांची कविता जन्माला आली. तत्कालिन वातावरणाने त्यांच्या कवितेचे भरणपोषण झाले. प्रेम, निसर्ग, व्यक्तिनिष्ठा या गोष्टी त्यांच्या कवितेत आहेतच; पण सामाजिक समता हे तत्त्व केशवसुतांच्या कवितांचा प्राण आहे. रुढी, परंपरेत जखडलेल्या माणसाला मुक्त करण्याचे काम करतानाच या नवमूल्यांचा आविष्कार त्यांनी सर्वप्रथम केला. मूर्तिभंजनाचे कार्य केले. अनेक टीकाकारांनी त्यांचा गौरव केला तर माधवराव पटवर्धनासारख्या टीकाकाराने

> 'केशवसुतांना आत्मकवित्वाची रोगट जाणीव झाली होती; या रोगट जाणिवेने त्यांची वृत्ती विपरीत झाली होती.'[१४]

असे खळखळजनक विधान केले होते. काहीही असले तरी काळावर स्वार होऊन केशवसुतांच्या कवितेने काळावर आपली मुद्रा कोरलीच. एकोणिसाव्या शतकातील मराठी कवितेत अंतर्बाह्य बदल घडवून आणले. सव्वाशे वर्षानंतरही त्यांच्या कवितेची चर्चा करणे अपरिहार्य ठरते हेच त्यांचे मोठेपण आहे.

## संदर्भसूची :


१) प.चिं. दामले, केशवसुतांची कविता, १९४९, पाचवी आवृत्ती, पृ.५९

२) दु.का. संत, स.रा. गाडगीळ, केशवसुत एक विवेचक अभ्यास, मॉडर्न बुक डेपो, पुणे-२, डिसेंबर १९५५, पृ.४

३) रा.श्री. जोग, केशवसुत काव्यदर्शन, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, प्र.आ. १९४७, पृ.२०

४) भवानीशंकर पंडित, केशवसुत पाच चिन्तनिका, महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती, प्र.आ. मे १९६१, पृ.४९

५) रा.श्री. जोग, तत्रैव, पृ.२४७

६) (सं.) प.चिं. दामले, केशवसुत - स्मृति-ग्रंथ, १९५६, पृ.४१

७) रा.शं. वाळिंबे, केशवसुत काव्य आणि परामर्श, सिटी बुक स्टॉल, पुणे, प्रथमावृत्ती, जून १९५८, पृ. १९२.

८) दि.के. बेडेकर, केशवसुतांची काव्यदृष्टी, पॉप्युलर प्रका.प्र.आ. १९६६, पृ.३९

९) (सं.) प.चिं. दामले, तत्रैव, पृ. ९७


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved

१०) दि.के. बेडेकर, तत्रैव, पृ.११६

११) मु.गो. देशपांडे, केशवसुत-काही दृष्टिकोन, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, प्रथमावृत्ती : १९६८, पृ.३१

१२) वि.स. खांडेकर, केशवसुत काव्य आणि कला, देशमुख आणि कं., प्रथमावृत्ती १९५६, पृ. ७९

१३) रा.श. वाळिंबे, केशवसुत काव्य आणि परामर्श, सिटी बुक स्टॉल, पुणे, प्रथमावृत्ती, जून १९५८, पृ. २०

१४) दु.का. संत, स.रा. गाडगीळ, केशवसुत, मॉडर्न बुक डेपो, डिसें. १९५५, पृ.५७

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved